Engg.

62

Dr. S. L. Limaye  0712-2582237 (34)

ATTN: SHULKA SAMITI
'A' Grade to Ramdeobaba K.N. Engg. College, Nagpur.

**ANNEXURE B1**

राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे गुणात्मक व दर्जानिहाय वर्गीकरण

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२००४/(२९९/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जुलै, २००४

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
क्र.पीईसी-२००३/(२१२/०३)/तांशि-१, दि.१९ ऑगस्ट,२००३
२) संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांचे
क्र.२/एनजीसी/२००४/दर्जानिहाय वर्गीकरण/२३०७,दिनांक८ जून, २००४ चे पत्र.

**शासन निर्णय :-** सन २००३-०४ पासून दोन वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे गुणात्मक आणि दर्जानिहाय वर्गीकरणास संदर्भाधीन दिनांक १९ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. यामधील ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना "ब "व " ई " दर्जा देण्यात आला आहे अशा संस्थांनी तसेच ज्या संस्थांचा दर्जा प्रसिध्द करण्यात आलेला नाही त्या संस्थांनी जर पुढील शैक्षणिक वर्ष २००४-०५ साठी, त्यांच्या संस्थेचे दर्जानिहाय वर्गीकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पुन्हा अर्ज केल्यास व शासनाने विहीत केलेले शुल्क भरल्यास त्यांना दर्जा उंचावण्यास पुन्हा संधी देण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन संदर्भाधीन दि.१९ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट " अ " मधील विभागीय कार्यालय, मुंबई येथील अनुक्रमांक-१२ व विभागीय कार्यालय, नागपूर येथील अनुक्रमांक ७ मध्ये दर्शविलेल्या संस्थांनी दर्जा उंचावण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केले होते. तसेच २ महाविद्यालयांनी प्रथमच दर्जानिहाय वर्गीकरणासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केला होता. या चार महाविद्यालयांची तंत्रशिक्षण संचालनालयाने तपासणी करुन संचालनालय स्तरावर समिती गठीत करुन, त्यांनी संबंधित ४ संस्थांना जो सुधारीत दर्जा दिला आहे त्यास शासनाकडून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये खालील ४ संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारीत दर्जा देण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | यापूर्वी संस्थेला दर्जा मिळाल्याचे वर्ष व मिळालेला दर्जा | सुधारीत दर्जा |
|---|---|---|---|
| १. | विद्यावर्धिनीचे कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, वसई, मुंबई | " क " दर्जा २००३ | " अ " दर्जा |
| २. | रामदेव बाबा कमला नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | " ड " दर्जा २००३ | " अ " दर्जा |

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

63

35

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री.विठ्ठल एज्युकेशन रिसर्च इन्स्टिट्यूटचे कॉलेज ऑफ इंजि., ता.पंढरपूर, जि.सोलापूर | -- | " अ " दर्जा |
| ४. | पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी पिंपरी, पुणे | -- | " अ " दर्जा |

मात्र सदर दर्जा हा २००४-०५ पासून दोन वर्षासाठी राहील तसेच संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या दर्जाचे पुनर्विलोकन दर २ वर्षानंतर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( श्या. र. चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता )
~~[illegible]~~
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्टेडियम परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००
२) सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्श्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

6

महाराष्ट्र शासन

क्रमांक: पीईसी.१९८४/
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक : २१ जून १९८४.

प्रति,

सचिव,
श्री रामदेवबाबा स्मारक सार्वजनिक समिती,
नागपूर.

विषय :- अशासकीय संस्थांना विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता...

महोदय,

अभियांत्रिकी/तंत्रशास्त्रामध्ये पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासंबंधीच्या आपल्या अर्जासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यासाठी आपल्या संस्थेस खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे :-

(अ) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: टिइसी ३३८२/१११८३६/(१२०)/तांशि-१, (अ), दिनांक २१ मे, १९८३ अन्वये अशा संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास मान्य असतील (सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.)

(ब) सुरू करावयाचे पदवी अभ्यासक्रम तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेऊन निश्चित केले जातील.

(क) नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ कलम ४३ अन्वये सदर महाविद्यालयाचे नागपूर विद्यापीठाशी संलग्नीकरण करण्यासाठी संस्थेने अर्ज केलेला असावा.

(ड) वरील (अ) व (ब) मध्ये नमूद असणारी कागदपत्रे औपचारिक बाबी या संस्थेद्वारे तंत्र शिक्षण संचालकांच्या सहमतीने, समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात येतील व त्या नंतरच अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अंतिम परवानगी व दिनांक तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून देण्यात येईल.

(इ) संस्थेने तयार केलेला प्रकल्प अहवाल हा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या पश्चिम विभागीय समितीने स्वीकारलेला असावा व त्यास परिषदेची अंतिम स्वीकृती असावी, अशी स्वीकृती मिळाल्यास महाविद्यालय सुरू करावे लागेल.

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

....२

6



५. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण त्वरीत तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच आपणांस सुचित करण्यात येते की, तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई व नागपूर विद्यापीठ यांनी लेखी स्वरुपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय आपण अभ्यासक्रमास प्रवेश देऊन सुरवात करु नये.

आपला विश्वासू,

[ वि. वि. देऊस्कर ]
[illegible] सचिव, महाराष्ट्र शासन.

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत नवीन पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास शासनाची मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टिइएम २००९/(१०३/०९)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १५ जुन, २००९

संदर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/११८३६/(११०)/तांशि-१, दिनांक २१.०५.१९८३
२. संचालक तंत्र शिक्षण यांचे दिनांक १५.०६.२००९ चे पत्र

शासन निर्णय : शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत नवीन पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या परिशीष्ट अ प्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास शासनाचे मान्यता देण्याचा संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केले आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधिल संस्थाना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ / घट करण्यास व अतिरीक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पुर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पुर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/ संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.
४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.
५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार पध्दतीनुसार करण्यात येतील.

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR